**दिनांक : 21/7/25**

**विषय : डेव्हलपमेंट अग्रिमेंट पेपर्स वर सोसायटी आणि बिल्डर च्या सह्या**

सभासद बंधू - भगिनींनो,

आज आपण आपल्या सोसायटीच्या पुनर्निर्माण प्रक्रियेत एक महत्वाचा टप्पा पार केला. एका लहानग्या समारोहात आज सोसायटी आणि डेव्हलपर ह्यात Development Agreement वर सह्या करण्यात आल्या. सोसायटीतर्फे अध्यक्ष श्री विजय सावंत, सचिव श्री विनायक पटवर्धन आणि खजिनदार श्रीमती अरुंधती भिडे यांनी तर बिल्डर तर्फे श्री संदीप माहेश्वरी आणि श्री विनय वडेरा यांनी सह्या केल्या. श्री प्रदीप नेवाळकर आणि श्री राजाराम जोशी यांनी साक्षीदार म्हणून सह्या केल्या.

ह्या समारंभाला पंच समिती चे सर्व सभासद, आपले सल्लागार श्रीमती किरण काबरा आणि श्री हर्षल कवडीकर तर बिल्डर तर्फे श्री संदीप माहेश्वरी, श्री विनय वडेरा श्री अमित नाटेकर इत्यादी लोकं उपस्थित होती. सचिवांनी उपस्थितांचे स्वागत करून कार्यक्रम ची रूप रेषा सांगितली तर अध्यक्षांनी सर्वांचे सहकार्य पुढे ही असेच मिळत राहो अशी इच्छा व्यक्त करून सर्वांचे आभार मानले.

आज सह्या झालेले Development Agreement ह्याच आठवड्यात रजिस्टर करून घेण्यात येणार आहे. डी ए चा मंजूर ड्राफ्ट आपल्या वेब साईट वर पहिलेच दिलेला आहे.

पंच समितीच्यावतीने